सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन

## धर्मादाय आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र राज्य मुंबई.

# नागरीकांची सनद - २०२२

# धर्मादाय आयुक्त कार्यालय,
# महाराष्ट्र राज्य मुंबई.

## प्रस्तावना,

महाराष्ट्र राज्यातील सार्वजनिक, धार्मिक व धर्मादाय विश्वस्त व्यवस्थांचे नियमन करण्याबाबत आणि त्यांच्या प्रशासनाकरीता अधिक चांगली तरतूद करण्याबाबत, महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० हा अधिनियम अंमलात आला. सदर अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणी करीता धर्मादाय संघटनेची स्थापना सन १९५२ साली करण्यात आली.

धर्मादाय आयुक्तालय हे महाराष्ट्र शासनाच्या विधि व न्याय विभागांच्या अंतर्गत येते. धर्मादाय आयुक्त, मुख्यालय व त्यांच्या अधिपत्याखालील एकूण ३५ जिल्हा कार्यालय महाराष्ट्र राज्यात आहेत.

सन १९५३ साली न्यासांची संख्या ५,००० इतकी होती. सन १९८३ मध्ये न्यासांची संख्या ९०,००० इतकी होती. **सद्यस्थितीत दिनांक ३१/१२/२०२१ रोजीच्या स्थितीनुसार एकूण ९,०४,१८५ इतके नोंदणीकृत सार्वजनिक न्यास आहेत.** नोंदविलेले सदर न्यास हे शैक्षणिक, वैद्यकीय, सामाजिक, धार्मिक या प्रकारचे कार्य करतात. धर्मादाय संघटनेतील कार्यालयीन संरचना सोबत सादर करण्यात येत आहे.

धर्मादाय संघटनेचे, महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम,१९५० व महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नियम,१९५१ तसेच संस्था नोंदणी कायदा,१८६० अंतर्गत कामकाज चालते. त्या करीता एकूण १८५९ पदे मंजूर करण्यात आलेली आहेत.

सार्वजनिक न्यासांची नोंदणी, न्यासाच्या नोंदीतील बदल, विश्वस्तांना सूचना देणे, न्यासांची नियमित तपासणी करणे, न्यासाच्या सुव्यवस्थानासाठी योजना करणे, न्यासांची हिशेबपत्रके दाखल करुन घेऊन त्यांची पडताळणी करणे व न्यासाशी सबंधित इतर अनुषंगिक तरतुदींच्या संदर्भात न्यासाचे पालक म्हणन धर्मादाय आयुक्त कार्यालय व अधिनस्त सर्व जिल्हा कार्यालय कार्य करततात.

न्यासांना आकारण्यात येणारे अंशदान हे सदर कायद्यानुसार सेवाशुल्क म्हणूनू आकारण्यात येते. त्याकरीता सार्वजनिक न्यास प्रशासन निधीची तरतूद करण्यात आलेली आहे. सदर निधीतून धर्मादाय संघटनेच्या पदांवर होणाऱ्या खर्चांची प्रतिपूर्ती करण्यात येते.

धर्मादाय रुग्णालयांसंदर्भात, महाराष्ट्र शासनाने, महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० मध्ये कलम ४१ अे अे ची नवीन तरतूद केली असून, ती दिनांक ०१.०८.१९८६ पासून लागू करण्यात आली आहे. सदरील तरतुदींनीनुसार धर्मादाय रुग्णालयांकडून निर्धन रुग्ण (Indigent Patient) व दुर्बल घटकातील रुग्ण (weaker Section Patient) यांना अनुक्रमे मोफत व सवलतीच्या दराने वैद्यकिय उपचार व्हावेत याकरीताची तरतूद करण्यात आलेली आहे. सदरील तरतुदींची अंमलबजावणी धर्मादाय रुग्णालयांकडून होते किंवा नाही याबाबत धर्मादाय संघटना देखरेख करते. तसेच सदर रुग्णांच्या तक्रारीचे निराकरण करण्यात येते.

**(महेंद्र के. महाजन)**
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

# धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई या संघटनेची कार्यालयाची कार्यकक्षा
## विभागीय व जिल्हास्तरीय कार्यालय



# धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई या कार्यालयाची (मुख्यालयाची) कार्यकक्षा.



# प्रशासकीय संरचना


विभागीय कार्यालय
धर्मादाय सह आयुक्त
धर्मादाय उप आयुक्त
सहायक धर्मादाय आयुक्त
अधीक्षक/जनसंपर्क अधिकारी
वर्ग-3 कर्मचारी
वर्ग-4 कर्मचारी
लघुलेखक (उ. श्रे.)
लघुलेखक (क. श्रे.)
जिल्हास्तरीय कार्यालय
धर्मादाय उप आयुक्त
सहायक धर्मादाय आयुक्त
अधीक्षक
लघुलेखक (क. श्रे.)
वर्ग-3 कर्मचारी
वर्ग-4 कर्मचारी

## न्याय शाखा :- धर्मादाय आयुक्त, धर्मादाय सह आयुक्त, सहायक धर्मादाय आयुक्त यांचे समोर त्यांच्या न्यायालयात दाखल होणारी प्रकरणे

| | |
|---|---|
| **धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय व धर्मादाय सह आयुक्त,** मुख्यालय/बृहन्मुंबई/पुणे/ औरंगाबाद/ नागपूर/ नाशिक/ कोल्हापूर/लातूर/ अमरावती. | महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० मधील, कलम ३३ (४), ३५, ३६, ३६ (१) अे व बी, ३६ (१) (अे) (३), ३६ (२), ३६ (५), ३६ (अे) (३) (अे), ४०, ४१ (डी) ४१(ई), ४१ (एफ), ४७, ७०, ७० अे, ८३ |
| **धर्मादाय उप आयुक्त, सहायक धर्मादाय आयुक्त कार्यालय,** मुख्यालय/बृहन्मुंबई/ठाणे/रायगड/ पालघर /कोल्हापूर/ रत्नागिरी/ सिंधुदुर्ग/ सांगली/ पुणे/अहमदनगर /सातारा / सोलापूर/नाशिक/जळगांव/ नंदूरबार/ धुळे/ औरंगाबाद/परभणी/नांदेड /जालना/ हिंगोली /लातूर/ उस्मानाबाद/बीड/अमरावती/ अकोला/ वाशिम/ यवतमाळ/बुलढाणा/नागपूर/वर्धा/ चंद्रपूर/ गडचिरोली/ भंडारा/ गोंदिया | महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० कलम १८ (१) , १९, २०, २१, २२, २२ (३) (अे), २२ (३) (बी), २२ अे, बी, सी, २८, ३७, ३९, ४०, ४१ (अे), ४१ (अे अे), ५० (अे), ५१, ५८ , ५९, ६८, ७९ अे - अे |

**प्रकरण दाखल करण्याची पध्दत** :-

उपरोक्त कलमान्वये दाखल होणाऱ्या प्रकारणांची अधिक्षक (न्याय शाखा) हे प्रथम प्राथमिक पडताळणी करतात व प्राथमिक कागदपत्रांची पुर्तता होत असल्यास, संबंधित प्रकरण हे संबंधित अधिकारणी यांचेकडे प्रकरणाचे वाटप करण्यात येते.

**आस्थापना विभाग** :-

सदर विभागात कार्यालयीन कर्मचाऱ्यांच्या सेवेसबंधातील सर्व कामकाज केले जाते.

**पत्रव्यवहार विभाग** :-

सर्व प्रकारचे टपाल आणि विविध प्रकारचे पत्रव्यवहार या विभागामार्फत आवक जावक केले जातात. सदर कामकाजासाठी या विभागात आवक व जावक नोंदणी केली जाते.

**रोख विभाग :-**

सदर विभागात खाली नमूद केल्याप्रमाणे सार्वजनिक न्यास प्रशासन निधी मध्ये रक्कम जमा होते.

१. विलंबाने प्राप्त होणारी हिशेबपत्रकाबाबत दंडाची रक्कम.
२. विलंबाने प्राप्त होणारे बदल अर्जाबाबत दंडाची रककम.
३. न्यास नोंदणी व संस्था नोंदणीचे नोंदणी शुल्कद्वारे जमा होणारी रक्कम.
४. नोंदणीकृत न्यासाची नोंदणी रद्द केल्यानंतर त्या न्यासाकडून प्राप्त होणारी रक्कम.
५. आदेशिकावाहक शुल्क फी .
६. नोटीस बजावणी करीता आदेशित केलेली रक्कम.
७. न्यासाकडून अंशदानामार्फत येणारी रक्कम.
८. प्रमाणित प्रती करीता आकारण्यात येणारे शुल्क.

(**संस्था नोंदणी अधिनियम, १८६० अन्वये नोंदणीकृत होणाऱ्या संस्थेमार्फत प्राप्त होणारी रक्कम ही केंद्र शासनाकडे चलनाव्दारे त्यांच्या खात्यात जमा केली जाते**.)

**प्रमाणित प्रत विभाग :-**

सदर विभागात प्रलंबित व निकाली प्रकरणांतील न्यायनिर्णय, साक्षीपुरावे व इतर कागदपत्रांपैकी नियमानुसार देय असणा-या कागदपत्रांच्या प्रमाणित प्रती दिल्या जातात. प्रकरणांतील कोणताही पक्षकार सबंधित सदर प्रमाणित प्रत मिळविण्यासाठी तात्काळ व सामान्य अशा दोन प्रकारे अर्ज करु शकतो. सामान्य अर्जासाठी ४/- रुपये व तात्काळ अर्जासाठी ७/- रुपये प्रती पृष्ठ अशी रक्कम आकारली जाते. तात्काळ अर्ज ४८ तासात व सामान्य अर्ज १० कार्यालयीन दिवसांत निकाली काढणे क्रमप्राप्त आहे. प्रकरणातील पक्षकारांशिवाय इतर व्यक्ती (त्रयस्थ व्यक्ती) सुध्दा प्रमाणित प्रती करीता अर्ज करु शकतात. त्यांना अर्जासोबत योग्य त्या कारणासहीत प्रतिज्ञापत्र सादर करावे लागते.

**अभिलेख विभाग :-**

सदर विभागात न्यायालयाने निकाली काढलेली प्रकरणे त्यांच्या न्यास नोंदणी क्रमांका नुसार व कलम निहाय जतन करण्यात येतात. सदर प्रकरणांमध्ये एखाद्या पक्षकारास / सबंधितास प्रकरणांचे निरीक्षण करावयाचे असल्यास, तसा अर्ज सादर करुन, पक्षकार त्या संदर्भात मान्यतेनंतर व आवश्यक ते शुल्क भरणा केल्यानंतर सदर प्रकरणांचे निरीक्षण घेऊ शकतो.

**ई-सेवा केंद्र :-**

१. न्यासाचे हिशेबपत्रके दाखल करण्याची सुविधा
२. संस्था/न्यास नोंदणीकरीता अर्ज दाखल करण्याची सुविधा
३. बदल अहवाल दाखल करण्याची सुविधा
४. कलम ४१ क अन्वये धर्मादाय कार्याकरीता निधी गोळा करण्याकरीताच्या परवानगीची सुविधा
५. धर्मादाय रुग्णालय संदर्भात निर्धन व दुर्बल घटकातील रुग्णाकरीता राखीव खाटा उपलब्धतेची माहिती, संपर्क व्यक्ती व संपर्क दूरध्वनी क्रमांक इत्यादीबाबतची अनुषंगिक माहिती

**धर्मादाय आयुक्त कार्यालयाचे ध्येय व दृष्टीकोण :-**

१. पक्षकारांनी दाखल केलेले प्रकरण शक्यतो लवकर चालवून त्यावर न्यायनिवाडा करणे तसेच प्रलंबित प्रकरणांची संख्या कमी करण्याचा प्रयत्न करणे. तसेच विशेष अभियानाद्वारे प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करणे.
२. सार्वजनिक न्यासांच्या विश्वस्तांना जास्तीत जास्त सोईचे होईल असे प्रशासन करणे. त्याकरीता प्रशासनात वेळोवेळी आवश्यक ते बदल, सुधारणा करणे.
३. धर्मादाय आयुक्त संघटना लोकाभिमुख होण्याकरीता प्रयत्नशिल राहणे.

**महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे** कलम ४१ क क अंतर्गत मा. उच्च न्यायालय आदेशित योजने नुसार धर्मादाय रुग्णांलयात निर्धन रुग्णांसाठी मोफत व दुर्बल घटकातील रुग्णांसाठी सवलतीच्या दराने वैद्यकिय उपचारांची सुविधा आहे. त्या अनुषंगाने सर्व धर्मादाय आयुक्त कार्यालय ही, धर्मादाय रुग्णालयांची तपासणी करतात तसेच योजनेच्या काटेकोरपणे अंमलबजावणीची देखरेख करतात.

## धर्मादाय आयुक्त कार्यालया मार्फत पुरविण्यात येणाऱ्या सेवा :-

१) ई-सेवा अंतर्गत विविध सेवा

२) अर्ध न्यायिक प्रकरणां सबंधित कागदपत्रांची प्रमाणित प्रत शक्यतोवर वेळेत उपलब्ध करुन देणे.

३) माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत मागितलेली देय व उपलब्ध माहिती वेळेत पुरविणे.

४) महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० च्या तरतुदींनुसार वाद नसलेल्या सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थांची नोंदणी सेवा व संस्था नोंदणी अधिनियम, १८६० अन्वये वाद नसलेल्या संस्थाची नोंदणी सेवा.

५) पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, प्रसाधनगृह सेवा.

६) प्रथमोपचार पेटी.

७) जनसंपर्क अधिकाऱ्यांच्या माध्यमातून अभ्यांगतांना मार्गदर्शन.

धर्मादाय आयुक्तालयाचे charity.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर धर्मादाय संघटनेशी सबंधित तसेच न्यासाच्या विश्वस्तांना मार्गदर्शक अशी माहिती उपलब्ध आहे.

28.1.22

**(महेंद्र के. महाजन)**
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

# महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० व संस्था नोंदणी अधिनियम, १८६० अन्वयेच्या तरतुदींनुसार धर्मादाय संघटनेचे कामकाज.

१) **धर्मादाय सह आयुक्त यांची विभागीय कार्यालये :-** मुख्यालय/बृहन्मुंबई/पुणे/औरंगाबाद/नागपूर/नाशिक/कोल्हापूर/लातूर/अमरावती.

२) **धर्मादाय उप आयुक्त यांची विभागीय कार्यालये :-** ठाणे/अहमदनगर/सोलापूर/जळगांव/सांगली/बीड/नांदेड/अकोला.

३) **सहायक धर्मादाय आयुक्त यांची जिल्हास्तरीय कार्यालये :-** ठाणे/रायगड/रत्नागिरी/सिंधुदुर्ग/अहमदनगर/सोलापूर/जळगांव/धुळे/सांगली/ सातारा/परभणी/नांदेड/उस्मानाबाद/बीड/जालना/अकोला/यवतमाळ/बुलढाणा/वर्धा/चंद्रपूर/गडचिरोली /भंडारा/हिंगोली/वाशिम/गोंदिया/ नंदूरबार/पालघर

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | सेवांचा तपशील | सेवा पुरविणारे अधिकारी / कर्मचारी यांचे नाव व हुद्दा | सेवा पुरविण्याची विहीत मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या वरिष्ठ अधिका-याचे नाव व हुद्दा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय व धर्मादाय सह आयुक्त, मुख्यालय/बृहन्मुंबई/पुणे/ औरंगाबाद/ नागपूर/ नाशिक/ कोल्हापूर/लातूर/ अमरावती. | १) **कलम-३३ (४)** विशेष लेखा परीक्षण | धर्मादाय आयुक्त / धर्मादाय सह आयुक्त | विहीत मुदत नाही | महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० मध्ये याबाबत तरतूद नाही. |
| | | २) **कलम ३५:-** विश्वस्त व्यवस्थेचा पैसा गुंतवणूक करण्याकरीता परवानगी | धर्मादाय आयुक्त / धर्मादाय सह आयुक्त | अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत. | महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० मध्ये याबाबत तरतूद नाही. |

# महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० व संस्था नोंदणी अधिनियम, १८६० अन्वयेच्या तरतुदींनुसार धर्मादाय संघटनेचे कामकाज.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | ३) **कलम ३६ (१) अे व बी :-** न्यासाची स्थावर मिळकत विक्री करणे, भाडयाने देणे, बक्षीस / दान देणे. | धर्मादाय आयुक्त व धर्मादाय सह आयुक्त | विहीत मुदत नाही | महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० मध्ये याबाबत तरतूद नाही. |
| | | ४) **कलम ३६ (अे) (३):-** पैसे कर्जाऊ घेण्यासाठी विश्वस्तांनी घ्यावयाची परवानगी | धर्मादाय आयुक्त व धर्मादाय सह आयुक्त | तात्काळ / जास्तीत जास्त १५ दिवसांचे आत | महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० मध्ये याबाबत तरतूद नाही. |
| | | ५) **कलम ३६(२) :-** विश्वस्तांची मिळकत विक्री व भाडयाने देणे यांस दिलेली मंजूरी रद्द करणेकरीता. | धर्मादाय आयुक्त व धर्मादाय सह आयुक्त | कालावधी विहीत नाही | महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० मध्ये याबाबत तरतूद नाही. |
| | | ६) **कलम ३६(५) :-** न्यासाची स्थावर मिळकत विक्री , भाडयाने देणे, हस्तांतरण करणे यांस कार्योत्तर परवानगी. (दि. १.०९.२०१७ पूर्वी केलेल्या व्यवहारांस कार्योत्तर परवानगी बाबत) | धर्मादाय आयुक्त | कालावधी विहीत नाही | महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० मध्ये याबाबत तरतूद नाही. |

# महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० व संस्था नोंदणी अधिनियम, १८६० अन्वयेच्या तरतुदींनुसार धर्मादाय संघटनेचे कामकाज.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | ७) **कलम ३६ (अे)(३)(अे) :-** राष्ट्रीयकृत किंवा शेडयुल बँक यांचेकडून घेतलेल्या कर्जास कार्योत्तर मंजूरी. (दि. १.०९.२०१७ पूर्वी केलेल्या कर्जास कार्योत्तर परवानगी बाबत) | धर्मादाय आयुक्त | कालावधी विहीत नाही | महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० मध्ये याबाबत तरतूद नाही. |
| | | ८) **कलम ४०:-** धर्मादाय आयुक्त यांचेकडे **कलम ३९** खाली सादर केलेल्या अहवालावर निर्णय देणे. | धर्मादाय आयुक्त / धर्मादाय सह आयुक्त | कालावधी विहीत नाही | महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० मध्ये याबाबत तरतूद नाही. |

# महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० व संस्था नोंदणी अधिनियम, १८६० अन्वयेच्या तरतुदींनुसार धर्मादाय संघटनेचे कामकाज.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | ९) **कलम ४१ (डी) :-** विश्वस्तांना निलंबित करणे, काढून टाकणे आणि बडतर्फ करणे. | धर्मादाय आयुक्त / धर्मादाय सह आयुक्त | **कलम ४१ (डी) (२) (अे)** अन्वये, धर्मादाय आयुक्त पोट कलम (१) अन्वये कार्यवाही करण्याचे ठरवील तेव्हा, ज्या विश्वस्त विरुध्द किंवा व्यक्ती विरुध्द कार्यवाही करण्याचे योजले असेल त्या विश्वस्तां विरुध्द किंवा व्यक्ती विरुध्द कार्यवाही करण्यासाठी जेव्हा प्रथम दर्शनी पुरावा आहे असे त्यास आढळून आले असेल फक्त तेव्हा धर्मादाय आयुक्तांस अशा विश्वस्तांला किंवा व्यक्तीला नोटीस देता येईल. **(ब) खंड (अ)** अन्वये, दिलेली नोटीस प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांचे आत उत्तर सादर करणे. **(क) खंड (अ) अन्वये**, दिलेल्या नोटीसीस उत्तर देण्यास कसूर अथवा उत्तर समाधानकारक न वाटल्यास, १५ दिवसांचे आत, अशा व्यक्ती विरुध्द दोषारोप ठेवणे, अशा दोषारोपांना उत्तर देण्याची सदर व्यक्तीला संधी दिल्यानंतर आणि दोन्ही बाजूंनी दाखल केलेल्या पुराव्यांचा विचार केल्यानंतर, दोषारोप ठेवल्याच्या दिनांकापासून ३ महिन्यांच्या आत, उक्त व्यक्तीस निलंबन, काढणे, बडतर्फ करणे अशी कार्यवाही करता येईल. विहीत मुदतीत नोटीस देणे दोषारोप ठेवणे आणि अंतिम आदेश देणे जर व्यवहार्य नसेल तर, धर्मादाय आयुक्त/ धर्मादाय सह आयुक्त त्या करीताची कारणे नमूद करतील. | मा. उच्च न्यायालय |

# महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० व संस्था नोंदणी अधिनियम, १८६० अन्वयेच्या तरतुदींनुसार धर्मादाय संघटनेचे कामकाज.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | १०) **कलम ४१( ई) :-** न्यासाचे नुकसान होत असल्यास त्या बाबतची चौकशी. | धर्मादाय आयुक्त, धर्मादाय सह आयुक्त | कालावधी विहीत नाही. | ज्या व्यक्ती विरुध्द ४१ (ई) अन्वये मनाई हुकूमाचा आदेश पारीत झाला असेल तर, आदेश पारीत झाल्याच्या दिनांकापासून ९० दिवसांचे आंत मा. उच्च न्यायालयाकडे अपील दाखल करावयाची तरतूद आहे. |
| | | ११) **कलम ४१ (एफ) विशिष्ट प्रकरणांत मालमत्ता जप्त करणे.** | धर्मादाय आयुक्त | कालावधी विहीत नाही. | मा. उच्च न्यायालय |
| | | १२) **कलम ४७ :-** विश्वस्तांची नेमणूक करणे, निलंबन, काढून टाकणे , किंवा मुक्त करणे आणि मालमत्ता नवीन विश्वस्ता निहित करणे. | धर्मादाय आयुक्त, धर्मादाय सह आयुक्त | कालावधी विहीत नाही. | मा. उच्च न्यायालय |
| | | १३) **कलम ७० :-** धर्मादाय उप आयुक्त, सहायक धर्मादाय आयुक्त, यांनी कलम -२०, २२, २२ अे, २८, ४१ सी, ५० अे, ५४(३), ७९(१), ७९ (अे अे) अन्वये दिलेल्या निर्णयाविरुध्द अपील करणे. | धर्मादाय आयुक्त, धर्मादाय सह आयुक्त | कालावधी विहीत नाही. | महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० मध्ये याबाबत तरतूद नाही. |

# महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० व संस्था नोंदणी अधिनियम, १८६० अन्वयेच्या तरतुदींनुसार धर्मादाय संघटनेचे कामकाज.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | १४) **कलम ७० अे** :- कलम ७० मध्ये नमूद केलेल्या कोणत्याही प्रकरणांत किंवा स्वयंखुद्द /अर्ज केल्यावर, धर्मादाय उप आयुक्त, सहायक धर्मादाय आयुक्त यांचेकडील अभिलेख व कामकाज मागविणे व ते तपासणे. | धर्मादाय आयुक्त, धर्मादाय सह आयुक्त | कालावधी विहीत नाही. | महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० मध्ये याबाबत तरतूद नाही. |
| | | १५) **कलम ८३** :- खटला दाखल करण्याकरीता मा. धर्मादाय आयुक्त यांची पूर्व मंजूरी आवश्यक असणे. | धर्मादाय आयुक्त, धर्मादाय सह आयुक्त | कालावधी विहीत नाही. | महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० मध्ये याबाबत तरतूद नाही. |
| | | १६) महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नियम, १९५१ चे नियम ३६ (१), (२), (३), (४) व (५) धर्मादाय आयुक्त यांचे अतिरीक्त कर्तव्य व अधिकार | धर्मादाय आयुक्त | कालावधी विहीत नाही. | महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नियम , १९५१ या मध्ये याबाबत तरतूद नाही. |

# महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० व संस्था नोंदणी अधिनियम, १८६० अन्वयेच्या तरतुदींनुसार धर्मादाय संघटनेचे कामकाज.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | १७) महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नियम, १९५१ चे नियम ३६ (१),(२), (३), (४) व (५) धर्मादाय सह आयुक्त यांचे अतिरीक्त कर्तव्य व अधिकार (महाराष्ट्राची अधिसूचना क. सीएच/१०८३(८२/अे)/६, दि. ३०.०३.१९८४ व दि. १३.०१.२०००) | धर्मादाय सह आयुक्त | कालावधी विहीत नाही. | महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नियम , १९५१ या मध्ये याबाबत तरतूद नाही. |